**राज्यात प्रिपेड वीज मीटर बसविणार**
**उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते प्रारंभ**

मुंबई, दि. १ मार्च २०११ :

प्रिपेड मोबाईल फोनच्या धर्तीवर राज्यात वीज बिलासाठी प्रिपेड मीटर लावण्यास प्रारंभ झाला असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या योजनेला आज अनौपचारिक सुरूवात झाली.

मंत्रालयात झालेल्या या कार्यक्रमास ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव सुब्रतो रथो, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक अजय मेहता आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात राज्यात सुमारे २५ हजार प्रिपेड वीज मीटर लावले जाणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात अशा प्रकारचे वीज मीटर लावणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. सुरवातीला पुणे, नागपूर, औरंगाबाद, पेण, कल्याण, कोल्हापूर परिसर तसेच महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा अशा पर्यटन स्थळ असणाऱ्या ठिकाणी प्रिपेड वीज मीटर लावले जातील.

प्रिपेड मीटर लावणाऱ्या ग्राहकांना वीज बिलात पाच टक्के विशेष सूट दिली जाणार आहे. या मीटरमधील वैधता संपल्यानंतर ऑनलाईन रिचार्ज करण्याची सुविधा आहे. कुठल्याही राष्ट्रीय सणांच्या दिवशी किंवा सुटीच्या दिवशी रिचार्ज अभावी वीज कनेक्शन कट होणार नाही. त्यासाठी खास **हॅप्पी अवर्स**ची त्यात सुविधा आहे.

या प्रिपेड मीटरची किंमत २ हजार ६०० रुपये असून त्याचा भार वीज ग्राहकांवर पडणार नाही. महावितरणतर्फे हे मिटर बसविले जाणार आहेत. हे मीटर वापराच्या दृष्टीने सुलभ असल्यामुळे कुणालाही अडचण येणार नाही. याचे कार्य प्रिपेड मोबाईल फोन प्रमाणेच असून या योजनेला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

दूरध्वनी क्र. २६४७४२११,
विस्तार क्र. ३५१२.

**सहमुख्य जनसंपर्क अधिकारी**